माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/४५/२०१९
दि.१५/०४/२०१९.

**<u>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.</u>**

श्री.राघवेंद्र चिदानंद दलबंजन,
ए-१६, दळवी चाळ, रामनगर रहिवाशी संघ,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व) ४०११०५ ठाणे. ...............अपिलार्थी

o/c

जनमाहिती अधिकारी तथा,
उप-कर निर्धारक व संकलक (कर) ...............प्रतिवाद

## -: विवेचन :-

श्री.राघवेंद्र चिदानंद दलबंजन यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांचेकडे दि.०५/०३/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१. गाव- खारी, सर्वे क्र.१४३(पार्ट) १४४ हिस्सा नं.-१, सर्वे क्र.१४५, हिस्सा नं.०८, मालमत्ता क्र.जी०३०००७४२८०० दळवी चाळ ए (रामनगर) नवघर रोड, भाईंदर (पूर्व) एकुण घरे ए/०१ ते ए/२० हे असुन ह्या सर्व घरांचे मालमत्ता कराचे हस्तांतरण (Transfer) करण्यासाठी कोणते मुळ दस्ताऐवज व ॲग्रीमेन्ट दिले आहे. ह्याची माहिती योग्य ती अर्जदारास मिळावी.

**<u>अपिल दाखल करण्याची कारणे:-</u>**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती मिळाली नसल्याने अपिलार्थी यांनी दि. /०४/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**<u>सुनावणीचा तपशिल:-</u>**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.३ यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१५/०४/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/७१/२०१९ दि.११/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.३ व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.२८/०२/२०१९ रोजीच्या पत्रानुसार माहिती दिलेली नाही.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

Scanned by CamScanner

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.३ यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती दिलेली असल्याने सदरचे अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (कर)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.राघवेंद्र चिदानंद दलबंजन,
ए-१६, दळवी चाळ, रामनगर रहिवाशी संघ,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व) ४०११०५ ठाणे.

O/C

Raghvendra C D
16/04/2019
9324131858

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

15/4/19

३) सहा.जनमाहिती अधिकारी तथा
कर निरिक्षक, प्रभाग क्र.३

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.

पोच
आवक-जावक
प्रभाग समिती क्र.३
मिरा भाईंदर महानगरपालिका
१५/४/१९

Scanned by CamScanner